सं.फौ.ख.क्र.१७८१/२०१९

नि. १७

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा शपथपूर्वक जबाब**

**मी शपथेवर सत्य कथन करतो की,**

**माझे नाव – भाऊसाहेब धोंडीराम देव्हारे,**

**वय –** ५२ वर्षे, व्यवसाय– नोकरी,

**राहणार –** लोणी, ता.राहाता, जि.अहमदनगर.

---

**सरतपास– अभियोगपक्षातर्फे श्री. जी.व्ही. बोर्डे,विद्वान विशेष सहायक सरकारी अभियोक्ता यांच्यातर्फे**

दिनांक ०६/०२/२०१९ रोजी मी व माझा मुलगा ओम असे आमची प्लेझर मोटारसायकलवरुन संध्याकाळी बाजार करून घरी चाललो होतो. त्यानंतर आमच्या गल्लीतील विराज काळे याने मला रस्त्यात हात दाखवुन थांबवले. त्यामुळे मी जनसेवा फाऊंडेशनच्या ऑफीसच्या पुढे स्पीड ब्रेकरजवळ माझी गाडी थांबविली. त्यावेळी ओम गाडीवरून खाली उतरला. त्यावेळी तेथे एक मोटारसायकल भरधाव वेगात आली व तिने ओमला उडविले. त्यानंतर आम्ही उपचाराकरीता पी.एम.टी हॉस्पीटलला गेलो. सदर मोटारसायकल स्वाराचे नाव शिंदे असे आहे. सदर मोटारसायकलस्वार पी.एम.टी हॉस्पीटलमध्ये कामाला होता. सदर दवाखान्यात ओम तीस दिवस भरती होता. घटनेची फिर्याद दोन तीन दिवसांनी देण्यात आली होती. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. ती तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१८** देण्यात आला. सदरची घटना ही मोटारसायकलस्वार शिंदे यांच्या चुकीमुळेच झाली आहे. मी आरोपीस पाहिल्यास ओळखू शकतो.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. व्ही.बी.पठारे यांच्यातर्फे –**

२. घटनेच्या वेळी माझ्या मुलाचे वय १७ ते १८ वर्ष असे होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी ओमकडे मोटारसायकल चालविण्याचा परवाना नव्हता. मी स्वतः सांगतो की, ओम त्यावेळी माझ्या पाठीमागे बसला होता. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी घटनास्थळी बाजार असल्यामुळे मोठी गर्दी होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे घटनास्थळी येणारे जाणारे वाहन हळू चालते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला ७ ते ८ फुटाचा कच्चा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्याचा वापर पायी येणारे लोक तसेच उभे असणारे लोक वापर करतात. हे म्हणणे खरे नाही की, घटनेनंतर मी व आरोपी नमुद हॉस्पीटलला मोटारसायकलने गेलो होतो.

३. मी पोलीसांना फिर्याद देताना असे सांगितले नव्हते की, सदर दवाखान्यात ओम तीस दिवस भरती होता. मी स्वतः सांगतो की, फिर्याद देताना ओम दवाखान्यात भरती होता. मी पोलीसांना फिर्याद देताना असे सांगितले नव्हते की, त्यानंतर आमच्या गल्लीतील विराज काळे याने मला रस्त्यात हात दाखवुन थांबवले. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादमधील माहिती आमचा शेजारी मुलगा आवारी यांनी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी मी माझे घरी हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळापासून पोलीस स्टेशन दीड किलोमीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, पी.एम.टी हॉस्पीटलमध्ये लोणी पोलीस स्टेशनचे कर्मचारी नेहमी हजर असतात. उपचार चालु असताना पोलीस आमचेकडे आले होते. मुलावर उपचार चालु असताना माझी पत्नी तेथे हजर होती. हे मला माहित नाही की, त्यावेळी मुलाने अथवा पत्नीने घटनेबाबत माहिती दिली होती किंवा कसे.

४. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा स्वतः गाडी चालवत होता व त्याच्या चुकीमुळे तो गाडी खाली पडुन सदर अपघात झाला. हे म्हणणे खरे आहे की, नुकसान भरपाई मिळण्याकरीता न्यायालयात आम्ही प्रकरण दाखल केले आहे व ते प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ नुकसान भरपाई मिळण्याकरीता मी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, त्यावेळी तेथे एक मोटारसायकल भरधाव वेगात आली व तिने ओमला उडविले. हे म्हणणे खरे आहे की, उर्वरित साक्षीदार हे माझ्या ओळखीचे आहेत. ओम उपचार कामी तीस दिवस भरती असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र मी पोलीसांना तपासाकामी दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दाखल केली असून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

**साक्षीदार मुक्त.**

दिनांक – १३/१०/२०२५

माझे समक्ष

PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2025.10.15 11:58:08 +0530

(प्र. शं. गिरगांवकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. ३, राहाता.

श्रवणोत्तर स्वीकृती

PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2025.10.15 11:56:19 +0530

(प्र. शं. गिरगांवकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. ३, राहाता.